मुख्य लेखा परीक्षक,
स्थानिक निधी लेखा,
महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय,
कोकण भवन सहावा मजला,
नवी मुंबई ४०० ६१४.

दिनांक:- 18 MAR 1998

कार्यालयीन आदेश क्रमांक १९ दिनांक

विषय:- अनुपालन पडताळणी बाबत.
१] जिल्हा परिषद/ पंचायत समिती प्रलंबित आक्षेप [पंचायत राज समिती व्यतीरीक्त]
२] पंचायत राज समिती अहवालातील प्रलंबित आक्षेप
३] नगरपालिका अहवालातील प्रलंबित आक्षेप

संदर्भ :- औरंगाबाद सभा दि. १०.व ११ फेब्रुवारी इतिवृत्त क्र. स्था१८/ब/सभा/अेस्तअे/४२२ दि. ५. ३. १९९८

औरंगाबाद येथील सभेत चर्चेअंती ठरल्याप्रमाणे पुढील आदेश देण्यात येत आहे.

१] जिल्हा परिषद/ पंचायत समिती प्रलंबित आक्षेप [पंचायत राज समिती व्यती रिक्त]

अ] सन १९९७-९८ पासून बांधकाम/ लघुपाटबंधारे व वित्त विभागाच्या लेखा परीक्षणाचे अंतिमीकरण उपमुख्य लेखा परीक्षक [वरीष्ठ] करतील. उर्वरीत विभागाचे अंतिमीकरण संबंधित जिल्हयाच्या उपमुख्य लेखा परीक्षक यांनी करावे.

ब] बांधकाम, लघुपाटबंधारे, वित्त व इतर विभागाचे जेथे धोरणात्मक निर्णय घेणे आवश्यक असेल असे परिच्छेद उपमुख्य लेखा परीक्षक [वरीष्ठ], यांनी अनुपालन पडताळणी अंती पुढील अभिप्राय देण्याचे अथवा वगळावयाचे आहे.

उर्वरित विभागाचे बाबतीत जिल्हयाचे उपमुख्य लेखा परीक्षक अनुपालन पडताळणी करुन पुढील अभिप्राय देतील/ वगळतील.

२] पंचायत राज समिती अहवालातील प्रलंबित आक्षेप:-

पंचायत राज समिती अहवालातील किमान १०० परिच्छेदाचे अनुपालन तयार असेल तेव्हाच अनुपालन पडताळणी शिबिर आयोजित करण्यात येऊन, सदर शिबिरास निम्नस्वाक्षरीतांना आमंत्रित करावे उपलब्धतेनुसार शिबिराच्या तारखा देण्यात येतील.

३] जिल्हा परिषद विभागाचे प्रलंबित अनुपालन सादर करताना अनुपालनावर मुख्य लेखा व वित्त अधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी यांची स्वाक्षरी असणे आवश्यक आहे. तर पंचायत समितीच्या अनुपालनावर मुख्य लेखा व वित्त अधिकारी व गटविकास अधिकारी यांची स्वाक्षरी असणे आवश्यक आहे.

कृ. मा. प